# वृत्तपत्राचे स्वरूप आणि महत्त्व

**डॉ. गामा मुकुंदराव सेलोकर**
प्रभारी प्राचार्य
श्रीमती सुग्रता वंजारी महिला महाविद्यालय,
वडोदा, ता. कामठी, जि. नागपूर.
Mob. 9823521187,
e-mail : gamaselokar20@gmail.com

---

**प्रस्तावना :–**

वृत्तपत्र या लेखात मुख्य शब्द वृत्त असा असला तरी केवळ वृत्त देणे एवढाच वृत्तपत्राचा आवाका नाही. वृत्तपत्रे ही वाचकांच्या जीवनाशी, विचारांशी, ध्येयवादाशी त्यांच्या सामान्य गरजा, त्यांचे प्रश्न त्यांवरील अन्याय, त्यांचे अभिमान,त्यांचे आनंद आणि दु:ख ही अशा वेगवेगळ्या प्रसंगाशी समरस झालेली असते. इ. स. १८३२ मध्ये बाळशास्त्री जांभेकर यांनी काढलेले दर्पण हे मराठी पत्रकारितेची गंगोत्री समजली जाते. वृत्तपत्रे ही अनेक पानांमध्ये प्रकाशित होत असतात. काही वृत्तपत्रे ही दररोज प्रकशित असतात, त्यांना दैनिके म्हणतात. काही वृत्तपत्रे ही आठवड्यला प्रकाशित होत असतात, त्यांना साप्ताहिक असे म्हणतात. काही वृत्तपत्रे ही पंधरा दिवसांनी प्रकाशित होत असतात त्यांना पाक्षिक असे म्हणतात. तर काही वृत्तपत्रे ही दर महिन्याला प्रकाशित होत असतात, त्यांना मासिक असे म्हणतात. काही वृत्तपत्रे दर तीन महिन्याला प्रकाशित होतात त्यांना त्रिमासिक असे म्हणतात. तर काही वृत्तपत्र ही दर सहा महिन्याला प्रकाशित होत असतात, त्याला सहामाही असे म्हणतात. तर दर वर्षी प्रकाशित होत असलेल्या वृत्तपत्राला वार्षिक असे म्हणतात. वृत्तपत्रांमधून आपल्याला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडी, राजकारण, साहित्य, कला, क्रीडा, आणि सांस्कृतिक घडामोडी समजतात. वृत्तपत्रांद्वारे आपल्याला जगात कुठे काय घडले ते समजते.

**शोधनिबंधासाठी वापरण्यात येणारी संशोधनपद्धती :–**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वापरण्यात येणारी माहिती व तथ्ये ही विषयाशी संबंधित व विविध पुस्तके, लेख, वर्तमानपत्र, मासिके व सांकेतिक स्थळावरून संकलित करण्यात आली आहे.

**संशोधनाचे उद्देश :–**

१. मानवी जीवनात वृत्तपत्राचे महत्त्व जाणून घेणे.
२. मानव प्राणी वृत्तपत्राकडे कोणत्या दृष्टीने पाहतात याचा शोध घेणे.
३. वृत्तपत्राला कशामुळे आकार प्राप्त होते याचा शोध घेणे.
४. माणसांच्या दृष्टीने वृत्तपत्रे म्हणजे जहांगीरची घंटा आहे काय याचा शोध घेणे.
५. वृत्तपत्र मानवाकरिता आवश्यक आहे काय हे जाणून घेणे.
६. वृत्तपत्रांचा इतिहास विषयी माहिती जाणून घेणे.

**संशोधनाची गरज व महत्त्व :–**

साहित्य आणि समाजाच्या विकासाला हातभार वृत्तपत्र लावत असतात. बातम्यांव्यतिरिक्त, वर्तमानपत्रातील मासिके आणि विशेष अंकांमध्ये साहित्यिक माहिती देखील समाविष्ट असते. त्यांच्यात प्रकाशित कविता, कथा, नाटक, निबंध, व्यंग इत्यादींच्या माध्यमातून वाचकांचे मनोरंजनच होत नाही, तर ज्ञानही वाढते. वर्तमानपत्रे समाज सुधारकांची महत्वाची भूमिका बजावतात, त्यामुळे वृत्तपत्राचे महत्व अनन्यसाधारण आहे.

Research Hub International Journal

वृत्तपत्राद्वारे आपल्याला जगभरातील विविध बातम्या तर मिळतात, तसेच वृत्तपत्र हे जगातील साहित्य आणि कला यांना चालना देणारे एक महत्वाचे साधन आहे. या अनुषंगाने प्रस्तुत संशोधनाचा विषय महत्वाचा आहे.

**वृत्तपत्र :—**

सर्वसामान्य माणसाच्या दृष्टीने वृत्तपत्र म्हणजे ''जहांगीरची घंटा'. ही गोष्ट आपल्या सर्वांना ठाऊक असेलच. जहांगीर बादशहाने आपल्या राजप्रासादात एक घंटा बांधून ठेवली होती. ती वाजवल्यावर बादशहा बाहेर येत असे. मुख्यत: अन्यायग्रस्त व्यक्ती आपले गाऱ्हाणं मांडण्यासाठी तेथे येत असत. घंटा वाजल्याबरोबर बादशहा बाहेर येत असे. अन्यायग्रस्ताचे गाऱ्हाणे दूर करण्याचा बादशहाचा प्रयत्न असे. तसे वृत्तपत्रांकडे सर्वसामान्य माणूस 'जहांगीर घंटा' म्हणूनच पाहतो. जेव्हा सरकार, प्रशासन, नेते मंडळी यांच्याकडून दाद मिळत नाही तेव्हा सामान्य माणूस वृत्तपत्राकडे येतो. न्यायालयावर त्याचा आजही विश्वास आहे. मात्र तेथे जाणे आणि दावा चालवणे यासाठी लागणारे कमीअधिक आर्थिक स्थैर्य अथवा बळ त्याच्याकडे नसते. त्यामुळे हा सामान्य माणूस त्याला आपण ग्यानबा म्हणूयात तो अतिशय विश्वासाने वृत्तपत्रांकडे धाव घेतो.

आपले गाऱ्हाणे मांडण्याचे लोकशाही मार्गावरचे हक्काचे साधन म्हणून सर्वसामान्य नागरिक वृत्तपत्राकडे पाहतात. याखेरीज शिक्षण देणे, माहिती पुरवणे, मनोरंजन करणे, प्रबोधनासाठी पूर्वतयारी या दृष्टीनेही वृत्तपत्राचे स्थान मोठे आहे. भारतासारख्या विकसनशील देशातील वृत्तपत्रांची जबाबदारी फार मोठी आहे. गेल्या पाच—सहा वर्षांत वृत्तपत्रांच्या वेळापत्रकाला मागे सारणाऱ्या, ताज्या बातम्या सलगपणे देणाऱ्या अनेक दूरचित्रवाहिन्या इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सुरू झाल्या आहेत. स्पर्धेच्या या युगात वृत्तपत्रांचे महत्त्व तसूभरही कमी झालेले नाहीय हे लक्षात घ्यायला हवे.

वृत्तपत्रांचे जग सुरू होण्यापूर्वी छापखान्यांचे युग सुरू झाले. मुद्रणक्रांती झाल्यामुळेच वृत्तपत्रांचा जन्म झाला. त्यामुळे जगातील प्रबोधनाला वेगळी गती आणि दिशा मिळाली. जर्मनीच्या गटेनबर्गने छापखाना सुरू केला आणि १६ व्या व्यवस्था शतकात माहिती क्रांतीचा पाया रचला गेला. ही सारी उत्क्रांती लक्षात घेऊनच वृत्तपत्रांच्या इतिहासातील पाने खालीलप्रमाणे आहेत.

१५ व्या शतकात मुद्रणकलांचा शोध, १६ व्या शतकात मुद्रणाची भारतात सुरुवात, १८ व्या शतकात भारताच्या भूमीत इंस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून इंग्रजांचा शिरकाव, त्यांच्या सांस्कृतिक प्रभावाच्या वाटचालीत देशातील प्रबोधनाला मिळालेले वळण आणि भारतीय वृत्तपत्रांचा आरंभ हे टप्पे लक्षात घ्यावे लागतील.

आरंभी म्हटल्याप्रमाणे इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा प्रभाव असा सर्वदूर पोहोचला तरी लोकांशी संवाद आणि संपर्क साधण्याचे, लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम वृत्तपत्र हेच राहिले आहे. वृत्तपत्र ही एक सांघिक निर्मिती आहे. गेल्या १० वर्षात इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी सांस्कृतिक जीवनात प्रभावीपणे स्थान मिळविले असले तरी वृत्तपत्रांच्या खपावर त्याचा यत्किंचितही परिणाम झालेला नाही. वृत्तपत्रांचे खप वाढत असल्याची आकडेवारी ह्याचा स्पष्ट संकेत देते.

सर्वसाधारणत: बातम्यांचे विविधांगी स्वरूप, संपादकीय पानाची विशिष्ट रचना, छायाचित्रांचा सुबकपणे केलेला वापर या सर्वामधून वृत्तपत्र आकार घेते. साधारणत: १९८६—८७ नंतर मुद्रणाच्या क्षेत्रात क्रांती झाली आणि अत्याधुनिक यंत्रणेतून वृत्तपत्रांची निर्मिती सुरू झाली. 'फोटो कंपोझ' हे त्या टप्प्याचे अथवा क्रांतीचे नाव, संगणकाच्या पडद्यावर ऑपरेटर जे टाईप करतोय ती अक्षरे, चित्रे दिसतात. या फोटो कंपोझमुळे वृत्तपत्रे अंतर्बाह्य बदलून गेली. लायनो अथवा मोनोटाइप वळणाच्या मुशीतून तयार होणारी वृत्तपत्रे आता 'फोटो कंपोझ'च्या युगात आली आहेत. हे बदल क्रांतीकारक ठरले आणि १५ व्या शतकातील गटेनबर्गच्या मुद्रण

कलेने २० व्या शतकात अत्याधुनिक स्वरूपाचा आविष्कार केला आहे. नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करीत वृत्तपत्रानी आपला चेहरा मोहरा बदलला आहे. दूरचित्रवाहिन्यांच्या चकचकत्या चमचमत्या जगाला वृत्तपत्रातले मथळे, त्यांचा टिकाऊपणा ज्याना आजही मागे टाकता आलेले नाही. सर्वसामान्य लोकांचाच नव्हे तर सर्व स्तरांतील लोकांचा आजही वृत्तपत्रात छापून येणाऱ्या शब्दांवर जो विश्वास आहेय तो कमी झालेला नाही. त्यामुळेच नवे माहिती युग येऊनही वृत्तपत्रांचे खप घसरलेले नाहीत, तर वाढले आहेतय याकडेही लक्ष वेधले पाहिजे.

भारतातील वृत्तपत्रांचा आरंभ, या वृत्तसृष्टीला सामाजिक जागरणाचा आधार देणारे भारतीय समाज प्रबोधनाचे उद्गाते राजा राममोहन रॉय हे आहेत. 'दर्पण' या मराठीतील पहिल्या वृत्तपत्राची सुरुवात, 'लोकहितवादींची शतपत्रे', 'केसरी' आणि 'सुधारक', 'दीनबंधू' ही नव्या जाणिवेची वृत्तपत्रे असा १९ व्या शतकातील कालखंड पाहणार आहोत.

त्या पाठोपाठ २० व्या शतकारंभी आणि मध्यापर्यंत म्हणजे भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंतच्या (१९४७) वाटचालीचा टप्पा पाहायची आहे. हा कालखंड घटनांनी आणि वृत्तपत्रांच्या जगातील बदलांनी भरलेला नवे प्रवाह, नवी वृत्तपत्रे यांमुळे महाराष्ट्रातील वृत्तपत्रांच्या इतिहासातील हा सर्वात महत्त्वाचा टप्पा ठरतो.

स्वातंत्र्योत्तर काळातील कालखंड अर्थातच विशेष महत्त्वाचा ठरतो. कारण या काळात आपण २० वे शतक संपून २१ व्या शतकापर्यंत आलो आहोत.

थोडक्यात, १८३२ पासून ते २००१ पर्यंतचा जवळपास १६९ वर्षाचा वृत्तपत्रांचा इतिहास येथे विचारात घ्यावयाचा आहे. भारताच्या इतिहासात आपला ठसा उमटविणाऱ्या व्यक्ती या कालखंडात पाहायला मिळतात. मराठी वृत्तपत्राची जडणघडण एवढी दृढ पायावर कशी उभी आहेय याची काही उत्तरेही येथे सापडतात. त्या दृष्टीने हे सारे नीट लक्षात घेतले पाहिजे.

जागतिक आणि भारतीय स्तरावरील वृत्तपत्रांचा इतिहास कालखंडाच्या भाषेत नमूद करायचा म्हटल्यास २०० वर्षांच्या आसपासचा आहे. मागे म्हटल्याप्रमाणे मुद्रणकलेचा आरंभ युरोपात झाल्यामुळे वृत्तपत्रांचा उगमही पहिल्यांदा तेथेच झाला. याबाबतीत रा. के. लेले यांनी आपल्या 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' या ग्रंथात अनेक तपशील दिले आहेत. ते लक्षात घेतल्यावर या एकूण वाटचालीची आपल्याला कल्पना येते.

इंग्लंड आणि हॉलंडमध्ये हँडबिलाच्या स्वरूपात लढाया, राजे–महाराजांच्या हालचाली या बातम्या छापून ती विकली जात. ती विकणारे विक्रेते जोरजोरात ओरडून लोकांचे लक्ष वेधत असत. या पत्रांना त्यावेळी 'गॅझेट' असे म्हटले जात असे. ही बातमीपत्रे मिळविण्यासाठी 'गॅझेटा' म्हणून नाणे द्यावे लागायचेय त्यामुळे 'गॅझेट' असे नाव पडले. १५ व्या शतकात मुद्रणक्रांती आणि १६ व्या शतकातील या घडामोडी म्हणजे जगातील वृत्तपत्रीय इतिहासाची होती सुरुवातच होती.

मुद्रणाच्या बाबत भारतात आरंभ झाला तो धार्मिक वाङ्मय छापण्यासाठी. भारतातला पहिला छापखाना सुरु झाला तो गोव्यात. १५६१ साली या छापखान्यात पहिले भारतीय पुस्तक छापले गेले. त्याची प्रत आज न्यूयॉर्क येथील सार्वजनिक वाचनालयात उपलब्ध आहे. मुद्रणाच्या बाबतीत तामिळ भाषेच्या जाणकारांनीही आवर्जून लक्ष दिले होते. तेवढे लक्ष मराठी भाषेच्या अभ्यासकांनी दिले नाही, अशी टीका इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी केली असल्याचे 'भारतीय ग्रंथमुद्रण' या ग्रंथात नमूद करण्यात आले आहे. मराठी साम्राज्याच्या काळातही मुद्रणाकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. मात्र त्याच ग्रंथात पेशवाईच्या काळात नाना फडणविसांनी गीतामुद्रणाचा प्रयत्न केला होता, अशीही महत्त्वाची नोंद करण्यात आली आहे. अर्थात, ही पूर्वपीठिका एकूण इतिहासाचे आणि त्यातही वृत्तपत्रांच्या वाटचालीचे बारीक दुवे



Research Hub International Journal

शोधण्याच्या दृष्टीने लक्षात घ्यावयाची आहे. भारतीय वृत्तपत्रांचा इतिहास आणि त्यात मराठी वृत्तपत्रांचा आरंभ या गोष्टीचे ऐतिहासिक महत्व सार्थपणे नमूद करण्यात आले आहे.

**निष्कर्ष :—**

१. सामान्य माणूस अतिशय विश्वासाने वृत्तपत्रांकडे धाव घेत असते.
२. वृत्तपत्र ही एक सांघिक निर्मिती आहे.
३. सर्वसामान्य नागरिक आपले गाऱ्हाणे मांडण्याचे लोकशाही हक्काचे साधन म्हणून वृत्तपत्राकडे पाहत असतात.
४. वृत्तपत्रांकडे पाहण्याचा दृष्टिकोण हा जहांगीर घंटा म्हणूनच पाहत असतो.
५. भारतामध्ये वृत्तपत्राला मोठया प्रमाणात महत्व देवून वृत्तपत्राची जबाबदारी फार मोठी आहे. असे आपल्याला दिसून येते.
६. ज्या देशामध्ये लोकशाही शासन व्यवस्था आहे, त्या देशामध्ये वृत्तपत्राला मोठया प्रमाणात महत्व आहे.
७. वृत्तपत्र हे समाजाची असलेली गरज आहे.

**उपाययोजना :—**

१. वृत्तपत्रावर सर्वसामान्य माणसांचा असणारा विश्वास हा टिकून राहावा याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.
२. वृत्तपत्राचे महत्व कमी होण्यास कारण शोधून त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे.
३. बातम्यांचे स्वरूप, विशिष्ट रचना, छायाचित्रांचा सुबकपणे केलेला वापर यामधून वृत्तपत्र आकार घेते, म्हणून या गोष्टींकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.
४. वृत्तपत्र हे सर्वांची गरज बनलेला असून त्यांची किंमत सर्वसामान्य माणसाला परवडेल ऐवढीच असायला पाहिजे.

**संदर्भग्रंथ :—**


- https://mr.m.wikipedia.org
- https://marathimitra.in
- https://www.esakal.com
- प्रसार माध्यमांसाठी लेखन कौशल्य, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक.


Research Hub International Journal